महा मेट्रो

PUNE METRO

महामेट्रो तर्फे मेट्रो मार्गिकेतील पावसाळी खड्डे , पदपथ , गटारांची झाकणे इ. दुरुस्ती

पुणे , ६ ऑगस्ट २०१९ : पुणे शहरात गेल्या ४-५ दिवसांपासून संततधार पाऊस सुरु असून त्यामुळे जागोजागी रस्ता खराब झाला आहे. त्यामुळे पुणेकरांना वाहतूक कोंडीचा त्रास होत आहे. पुणे मेट्रो मार्फत मेट्रो मार्गिकेतील रस्त्यांचे खड्डे, पदपथ, गटारांची झाकणे , पावसाचे पाणी वाहून नेणारे पाइप इत्यांदीची दुरुस्ती युद्ध पातळीवर सुरु केली आहे. महामेट्रो वेळोवेळी ही रस्ते दुरुस्तीची कामे करत असते परंतु अतिवृष्टीमुळे विशेष मोहिमेद्वारे रस्ते दुरुस्ती अभियान राबवत आहे. महामेट्रोचे काम पीसीएमसी ते खडकी , रामवाडी ते सिव्हिल कोर्ट व वनाज ते सिव्हिल कोर्ट या मार्गिकांमध्ये अत्यंत वेगाने सुरु आहे. या तिन्ही मार्गिका शहराच्या दाट वस्तीच्या भागातून जात असून येथील वाहतूक नियमनासाठी मेट्रोने जागोजागी ट्रॅफिक वॉर्डनची नियुक्ती केली आहे. हे ट्रॅफिक वॉर्डन वाहतूक पोलिसांना मदत करत असून त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होत आहे.

महामेट्रोचे अधिकारी सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून असून पावसाळी खड्डे बुजवण्यासाठी एक विशेष कृती दल बनविले आहे. आतापर्यंत पीसीएमसी ते सिव्हिल कोर्ट या मार्गिकेत ४३५ पावसाळी खड्डे, ६० गटारांचे झाकणे दुरुस्त करण्यात आले आहेत. तसेच ६० मीटर कॉंक्रिट रोड नवीन बनविला आहे.

वनाज ते सिव्हिल कोर्ट या मार्गिकेत २५१ पावसाळी खड्डे बुजविण्यात आले असून २६ गटारांची झाकणे दुरुस्त करण्यात आली आहेत. तसेच ६६ पावसाळी खड्डे येत्या दोन दिवसात बुजविण्यात येणार आहेत. रामवाडी ते सिव्हिल कोर्ट या मार्गिकेत ४२७ पावसाळी खड्डे बुजविण्यात आले असून ५२ गटारांची झाकणे दुरुस्त करण्यात आले आहेत.

महामेट्रोने ठिकठिकाणी वाहतूक दिशादर्शक चिन्हे, वाहतूक चिन्हे, दिवे, वाहतूक फलक, लावले असून त्यामुळे वाहतूक नियमन करण्यास मदत होत आहे. रस्त्याच्या खड्डे दुरुस्तीसाठी विशेष पथक परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे .